**कनिष्ठ सहाय्यक गट-क या पदावरून परिचर**
**गट-ड या पदावर पदावनत करणे बाबत.**
(श्रीम भोगे बाई मधुकर, कनि सहा, पं.स.कर्जत)

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**सामान्य प्रशासन विभाग**
जिल्हा परिषद आदेश क्रमांक.साप्रवि/आस्था-३/३५०/२०२५
अहिल्यानगर दिनांक /०३/२०२५
०१/०४/२०२५

वाचा:- १. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम २७ (१) (बी)
२. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/१३२५/२०२४ दिनांक १५/१०/२०२४
३. श्रीम बाई मधुकर भोगे, कनि सहा, पंचायत समिती कर्जत यांचा दि २०/०३/२०२५

श्रीम बाई मधुकर भोगे, कनि सहा, पंचायत समिती कर्जत यांना संदर्भ क्रमांक ०२ च्या आदेशान्वये परिचर गट-ड या संवर्गातुन कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या पदावर पंचायत समिती कर्तत येथे पदस्थापना देण्यात आलेली आहे.

तथापी श्रीम बाई मधुकर भोगे, कनि सहा, पंचायत समिती कर्जत यांनी संदर्भ क्र. ३ च्या विनंती अर्जाव्दारे कौटुंबिक कारणास्तव कनिष्ठ सहाय्यक गट-क या पदावरुन परिचर गट-ड या पदावर पदावनत करणेबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार संदर्भ क्रमांक ०१ मधील तरतुदीनुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर श्रीम बाई मधुकर भोगे, कनि सहा, पंचायत समिती कर्जत यांना कनिष्ठ सहाय्यक या पदावरून **परिचर गट-ड** या पदावर पदावनत करून त्यांना परिचर गट-ड या पदावर **भज-क** प्रवर्गात सुधारीत वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर **एस-१ (१५०००-४७६००)** या वेतनश्रेणीमध्ये **पंचायत समिती कर्जत** येथे पदस्थापना देत आहे.

तसेच श्रीम बाई मधुकर भोगे, कनि सहा, पंचायत समिती कर्जत यांची परिचर गट-ड या पदावर वेतन निश्चिती करतांना त्यांना कनिष्ठ सहाय्यक गट-क या पदावर पदोन्नती दिली नसती तर त्यांनी जे वेतन घेतले असते त्याप्रमाणे वेतन निश्चिती करण्यात यावी. तसेच यापुढे श्रीम बाई मधुकर भोगे, कनि सहा, पंचायत समिती कर्जत यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात येऊन त्याची नोंद संबंधिताचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202504010400042 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 01-04-2025 15:03:23
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रति,**

श्रीम बाई मधुकर भोगे, कनि सहा, पंचायत समिती कर्जत
द्वारा:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत

**प्रत:- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव**

१. **गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत**

२/- उक्त कर्मचारी हजर होताच हजर अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

**प्रत:-** मुळ नस्ती.